दैनिक

# महावृत्त

ई – मेल dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते.मो.९४२१०९४९९१,७२६४०७९९९०





लातूर वर्ष ३ रे अंक ९९ वा बुधवार दि.३० ऑगस्ट २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सल्फर, ल्युमिनियमसह ऑक्सिजनही आढळले

नवी दिल्ली : भारताच्या चांद्रयान–३ मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्थने मंगळवार दि. २९ ऑगस्ट रोजी महत्त्वाची माहिती दिली आहे. चंद्राच्या पृष्ठभागावरील दक्षिण ध्रुवावर सल्फर असल्याचा निर्वाळा प्रज्ञान रोव्हरने दिला आहे. त्याशिवाय, इतर धातू आणि ऑक्सिजनचे प्रमाण आढळले आहे. इस्रोकडून आता हायड्रोजनचा शोध सुरू आहे.

इस्रोने म्हटले की, इन–सिटू (इन सिटू) वैज्ञानिक प्रयोग सुरू आहेत इन–सीटू मापनाद्वारे, रोव्हर–वरील 'लेझर–इंड्युस्ड ब्रेकडाउन स्पेक्ट्रोस्कोप' या उपकरणाने प्रथमच दक्षिण ध्रुवावर सल्फर स्पष्टपणे शोधले आहे.



-l, Ca, Fe, Cr, Ti, Mn, Si, आणि ज चा शोध लागला असून आता हायड्रोजनचा शोध सुरू असल्याचे इस्रोने म्हटले. लिब्स नावाचा हा पेलोड बेंगळुरू येथील इस्रोच्या इलेक्ट्रो–ऑप्टिक्स सिस्टम्स प्रयोगशाळेत विकसित केला गेला आहे.

चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर काय आढळले?

इस्रोने दिलेल्या माहितीनुसार, इस्रोच्या माहितीनुसार चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर ल्युमिनियम, कॅल्शियम, लोखंड, क्रोमियम, टिटॅनियम, मॅंगनिस, सिलिकॉन आणि ऑक्सिजन असल्याची माहिती देण्यात आली आहे. दक्षिण ध्रुवावर पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात धातू असल्याचे आढळून आले आहे. दक्षिण ध्रुवावर हायड्रोजनचा शोध रोव्हरकडून सुरू असल्याची माहिती इस्रोने दिली आहे.

'प्रज्ञान'ने दक्षिण ध्रुवावरील मातीचे तापमान मोजले

विक्रम लँडरमधून वेगळे झाल्यानंतर प्रज्ञान रोव्हरने आपल्या कामास सुरुवात केली आहे. प्रज्ञान रोव्हरने चंद्रावरील दक्षिण ध्रुवावरील मातीचे परीक्षण सुरू केले. इस्रोने मातीच्या तापमानाचा आलेखही शेअर केला आहे. आलेखामध्ये तापमान उणे १० अंश सेल्सिअस ते ५० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक असल्याचे दिसून आले.

चांद्रयान–३ ने २३ ऑगस्ट रोजी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग केले होते. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग करणारा भारता हा पहिलाच देश आहे.

## 'इंडिया'च्या बैठकीसाठी मुंबई सज्ज

मुंबई : प्रतिनिधी

भाजपाला सक्षम पर्याय देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आघाडीची, 'इंडिया'ची तिसरी बैठक गुरुवारी मुंबईत सुरू होत असून दोन दिवसांच्या या बैठकीसाठी ५ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह देशभरातील विरोधी पक्षाचे सर्व प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत आघाडीचे निमंत्रक व समन्वय समिती नियुक्त करणे, आघाडीचा झेंडा, लोगो व अजेंडा निश्चित करणे, जागावाटचे सूत्र ठरवणे याबाबत चर्चा होणार आहे. त्यामुळे आगामी निवडणूक देशाच्या राजकारणाची दिशा ठरवणारी असणार आहे.

विरोधी आघाडीची पहिली बैठक पाटण्यात, तर दुसरी बैठक बंगळुरू येथे झाली होती. आता तिसरी बैठक मुंबईत होत असून, या बैठकीसाठी २६ पक्षांचे सुमारे १०० नेते उपस्थित राहणार आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी, मलिकार्जुन खरगे यांच्याबरोबरच ममता बॅनर्जी, अरविंद केजरीवाल, एमके स्टॅलिन, नितीश कुमार, हेमंत सोरेन असे पाच राज्याचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय जनता दलाचे नेते लालूप्रसाद यादव व बिहारचे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव आजच मुंबईत दाखल झाले.

आघाडी म्हणून अनेक पक्ष एकत्र आले तरी ते निवडणूक आपापल्या पक्षाच्या चिन्हावर लढणार आहेत. त्यामुळे एकसंघपणा वाटावा, यासाठी आघाडीचा झेंडा व 'लोगो' तयार करण्याची व प्रत्येक पक्षाने आपल्या निवडणूक चिन्हाबरोबर प्रचारात त्याचा वापर करावा, अशी कल्पना पुढे आली आहे. त्याबाबतही या बैठकीत चर्चा होणार आहे.

किमान समान कार्यक्रमावर चर्चा

जागावाटपाचे एक ढोबळ सूत्र ठरवावे व याबाबत निर्माण होणा–या तंट्याचा निवाडा करण्यासाठी एक समिती नेमावी,असा पर्याय पुढे आला आहे. आघाडीच्या मुंबईतील बैठकीत याबाबत महत्वाचा निर्णय होणार आहे.आघाडीच्या किमान समान कार्यक्रमावर मुंबईच्या बैठकीत चर्चा होणार असून, किमान समान कार्यक्रमच २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचा जाहीरनामा असणार आहे.

## बांधकाम कामगाराला दोन लाख नव्वद हजार रुपये नुकसान भरपाई.

लातूर :– अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या पाठपुराव्यामुळे अपघातग्रस्त बांधकाम कामगार सुरज मोहन चौधरी रा. विजय नगर नांदेड रोड लातूर यांना मिळाली दोन लाख नव्वद हजार रुपये इतकी नुकसान भरपाई.

सविस्तर वृत्त असे की सुरज मोहन चौधरी हा कामगार ज्ञानोबा तिरुके यांच्या सावेवाडी रमा टॉकीज समोर चालू असलेल्या बांधकामावर मजूर म्हणून कामाला होता. २३ एप्रिल रोजी सुरजच्या डोक्यात पाचव्या मजल्यावरून बांधकामावरची वीट पडली आणि सुरज गंभीररित्या जखमी होऊन बेशुद्ध झाला, त्यामुळे त्यांना तातडीने लोकमान्य हॉस्पिटलमध्ये दाखल केले त्या ठिकाणी प्रथमोपचार करून नंतर विवेकानंद हॉस्पिटल येथे दाखल करून त्याच्या डोक्याचे ऑपरेशन करून



इलाज केला त्यानंतर सूरज हा शुद्धीवर आला. तीन–चार दिवसानंतर मालक शिवाजी तिरुके व ठेकेदार विजय दिक्षे यांनी घरी नेऊन सोडले आणि निघून गेले. त्यानंतर ते त्यांच्याकडे गेले नाहीत. सुरज शुद्धीवर आला पण त्याचे बोलणे बंद झाले त्याचा एक हात व पाय उचलत नाही तो एका बाजूने अपंग झाला. डॉक्टरांना दाखवल्यास त्याचे पुन्हा मेंदूचे ऑपरेशन करण्याचे डॉक्टरांनी सांगितले पण त्यांच्याकडे ऑपरेशन साठी पैसे नसल्यामुळे त्याच्या आईने मालक व गुत्तेदार यांच्याकडे चकरा मारल्या पण त्यांनी दाद दिली नाही म्हणून त्यांनी राजकुमार होळीकर अध्यक्ष अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेकडे तक्रार दिली त्या तक्रारीवरून राजकुमार होळीकर यांनी कामगार खात्याकडे सुरज चौधरी यांची बाजू लावून धरली. कायदेशीर बाबीचा पाठपुरावा केला

त्यानंतर मालक व ठेकेदार यांनी मिळून सुरज ला दोन लाख नव्वद हजार रुपयांचा धनादेश सहाय्यक कामगार आयुक्त मा. मंगेश झोले यांच्या हस्ते देण्यात आला. याप्रकरणी सरकारी कामगार अधिकारी मा. अविनाश देशमुख यांनी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले.

## लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २५ टक्के आग्रीम रक्कम वितरीत करा, खासदार सुधाकर शृंगारे यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

लातूर :– लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २५ टक्के आग्रीम रक्कम वितरीत करा, खासदार सुधाकर शृंगारे यांची जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी गेल्या १ महिन्यापासून जिल्हाभरामध्ये पावस–ाने मोठ्या प्रमाणत खंड दिलेला असून ऐन जोमात आलेली आणि फुलोऱ्यात आलेली सोयाबीनचे पिके माना टाकू लागल्याने शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास जातो की काय अशी परिस्थिती आज जिल्हाभरामध्ये निर्माण झालेली असल्याने शासन निर्णयानुसार २५ टक्के आग्रीम (आगाऊ) विम्याची रक्कम जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट वितरीत करण्याबाबत आपल्यास्तरावरून संबंधितांना सूचना प्रदान करून निर्देश द्यावेत अशी विनंती लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुधाकर शृंगारे यांच्यासह लातूर भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव मालक देशमुख आणि लातूर शहर भाजपा जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी लातूरच्या जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर–घुगे यांना केली.



याप्रसंगी माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव मालक देशमुख, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, दिग्विजय काथवटे, वसंत डीगोळे,तुकाराम मद्दे, प्रकाश देशमुख, रामकृष्ण कोतलापुरे, संजय गिरी, रवी सुडे, नितीन रेड्डी, प्रताप पाटील, परमेश्वर पाटील, श्रीकांत देशमुख, रणजित मिरकले, अंकुश जनवाडे, दत्तात्रय जमालपुरे, काशीनाथ स्वामी, दिलीप येनगे, साई हिप्पाळे, रमेश पाटील, महारुद्र होळदांडगे यांच्यासह लातूर भाजपा चे पदाधिकारी, नागरिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हाभरामध्ये गेल्या १ महिन्यापासून पावसाने खंड दिलेला असल्याने सर्वच पिके पावसाअभावी वाळत आहेत त्यामुळे महसूल विभागाने तत्काळ शेतीपिकांचे पंचनामे करून २५ टक्के विम्याची अग्रिम संरक्षित (आगाऊ) रक्कम देण्याबाबतची अधिसूचना विमा कंपनीस निर्गमित करण्याबाबतची विनंती भारतीय जनता पार्टी लातूर च्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर–घुगे यांना केळी.

सोयाबीनचे पीक अगदी फुलोऱ्यात येत असतानाच पूर्ण जिल्हाभरामध्ये पावसाचा मोठ्या प्रमाणत खंड पडलेला असून सोयाबीनच्या संभाव्य उत्पादनात ५० टक्के पेक्षा अधिक घट होण्याची शक्यता आज पूर्ण जिल्हाभरामध्ये निर्माण झालेली आहे. शासन निर्णयानुसार एकूण घट ५० टक्के पेक्षा अधिक असल्यास एकूण अंदाजित पीकविमा रकमेच्या २५ टक्के अग्रिम (आगाऊ) रक्कम शेतकऱ्यांना देण्याची तरतूद असून त्या तरतुदीच्या अनुषंगाने २५ टक्के आग्रीम (आगाऊ) रक्कम शेतकऱ्यांना वितरीत करण्याबाबत आपण तत्काळ विमा कंपनीस सूचना कराव्यात आणि पुढील काळामध्ये जर पावसाचा खंड असाच राहिला तर महसूल विभागाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे काटेकोरपने पंचनामे करून एकही पात्र शेतकरी मिळणाऱ्या मदतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी विनंती लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुधाकर शृंगारे यांनी लातूर च्या जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर–घुगे यांना केली.

## झालर क्षेत्रातील नियमबाह्य कर वसूलीतून शासनाची फसवणूक

## कासारगावमध्ये २० वर्षात कोट्यावधींचा महसूल घोटाळा

लातूर : लातूर शहरालगत असलेल्या कासारगाव ग्रामपंचायतीने आपल्या हद्दीबाहेरच्या झालर क्षेत्रात कारभारीय हस्त–क्षेप करत बांधकाम परवाने, ८ अ, विविध घरपट्टी, पाणीपट्टी यासह विविध कर वसुली बेकायदेशिररित्या करून तो पैसा शासनाकडे जमा केला नसल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले आहे. सन २००० ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधीत असलेल्या संबंधीत ग्रामस्थांनी महसुलाचा हा पैसा वसुल करून संबंधीत रहिवाशी, वरिष्ठ अधिकारी व शास–नाची दिशाभूल तर केलीच, शिवाय हा वसुल पैसा शासन दप्तरी जमा केलाच नाही, हे उघड झाले आहे. कोट्यावधी रूपयांच्या या महसुल घोटाळा प्रकरणातील सर्व संबंधितांची चौकशी करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी जनआवाज फाऊंडेशनने जिल्हा परिषदेकडे केली आहे.



लातूर शहरालगत कासारगाव ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायतीअंतर्गत यशवंत नगर, काशिलिंगेश्वर नगर, सोहम कॉलनी, बनसोडे नगर, सिध्दीविनायक नगर व इतर मोठा परिसर कासारगाव शिवारात होता. मात्र या क्षेत्राला झालर क्षेत्र म्हटले जायचे त्यामुळे कासार गाव ग्रामपंचायतीला केवळ ८ अ नोंदणीसाठी तात्पुरती परव–ानगी देण्यात आली होती. मात्र ग्रामपंचायतीच्या संबंधीत ग्रामसेवकांनी सन २००५ पासून २०२१ पर्यंत ८ अ नोंदणी तर केलीच, त्याचा गैरफायदा घेत बेकायदा बांधकाम परवाने दिले व विविध प्रकारचे करही वसुल केले. याच मुद्यावरून जिल्हा परिषदेकडे या गैरव्यवहाराच्या तक्रारी गेल्यानंतर तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांनी २०१३ मध्ये लातूरच्या गटविकास अधिकार्यांना पत्र लिहून कासारगाव ग्रामपंचायतीला हद्दीबाहेरील क्षेत्रामध्ये असलेले भुखंड नोंदविता येणार नाहीत, ना हरकत प्रमाणपत्र देता येणार नाहीत, विविध कामांचा निधी ग्रामपंचायतीमार्फत खर्च करणे, बांधकाम परवाने देणे आदि कामे करता येणार नाहीत. व ती ग्रामपंचायतीने करू नयेत, याबाबत आपल्या स्तरावरून ग्रामपंचायतीस सुचना द्याव्या असे स्पष्ट बजावले होते. तरीही त्यानंतर कासारगावच्या ग्रामपंचायतीने बेकायदा नोंदी घेतल्या, करवसुली केल्या. मात्र या वसुलीचा कोणताही मागमुस मागे ठेवला नाही. शिवाय या महसुल वसुलीचा पैसा वरिष्ठ शासकीय कार्यालयाकडे जमाही केला नाही. त्यामुळे या सर्व कामांना जबाबदार असणार्या सन २००० ते २०२१ या कालावधीतील संबंधीत ग्रामसेवकांच्या तसेच ग्रामपंचायतीच्या कारभाराची व दप्तराची तपासणी व चौकशी करावी, तसेच चौकशी सुनावणी आपल्या उपस्थितीत घ्यावी अशी मागणी जनआवाज फाऊंडेशनचे संस्थापक ॲड.नारायण पी.नागरगोजे व अरविंद कापसे यांनी केली आहे.

....अन्यथा न्यायालयात दाद मागू

याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे अनेकदा तक्रारी करूनही आजपर्यंत या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करणार्या सर्व संबंधितांची चौकशी करावी. कासारगाव झालर क्षेत्रातील सर्व मालमत्तांच्या नोंदी नियमीत कराव्यात अशी मागणी नागरगोजे यांनी या पत्रकार परिषदेत केली आहे. या प्रकरणाची चौकशी व मालमत्तांच्या नोंदी नियमीत न केल्यास तसेच तत्कालीन महसुल आर्थिक गैरव्यवहारातील ग्रामसेवक श्रीमती इरे मॅडम (कालावधी – २०/१०/२००५ दते २७/२/२००७), श्री बनकर (३/४/२०१० ते ११/०३/२०११), हुसेन शेख (२६/११/२०११ ते ३१/०३/२०१६), अनंत सुर्यवंशी (०३/०४/२०१९ ते २०२०) श्री मोरे (०१/०४/२०२० ते ११/०९/२०२०) आणि उत्तम गोमसाळे (२०२०–२१) यांच्या कारभाराची चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करून दोषींना बडतर्फ करावे अन्यथा आपण न्यायालयात धाव घेवू असा इशाराही ॲड.नारायण नागरगोजे, अरविंद कापसे यांनी दिला आहे.

## फुले,आंबेडकरी साहित्याचे भाषांतर होणे गरजेचे – माजी न्यायाधीश अनिल वैद्य




: नागपूर––फुले आंबेडकरी साहित्याचे। इंग्रजी व इंग्रजीतुन मराठी,हिंदीत भाषांतर होणे गरजेचे आहे.असे मत माजी न्यायधीश व आंबेडकरी विचारवंत अनिल वैद्य यांनी मानले.परिवर्तन विचारमंच,नागपूर यांच्या वती–ने हिंदी मोरभवन येथे महात्मा फुलेंच्या गुलामगिरी ग्रंथाचे इंग्रजी भाषांतरित पुस्तकाचे प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी रमेश येसंबरे, आनंद गंभीर,डॉ. राजेंद्र वैद्य,प्रा.संध्या वैद्य परिवर्तन विचार मांच्या सदस्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिल वैध,माजी न्यायाधीश यांचे वृक्ष देऊन स्वागत करण्यात आले., प्रमुख अतिथी तुकाराम माने,आंबेडकरी साहित्याचे अभ्यासक,मुंबई, विजय धांडे, माजी जिल्हा व सत्र न्यायाधीश,डॉ. ॲड रमेश राठोड,पत्रकार ताराचंद मेंढे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विलास गजभिये,सूत्र संचालन डॉ. अशोकानंद देशभ्रतार तर आभार प्रदर्शन डॉ. सुनंदा जुळ यांनी केले

## संपादकीय....

# देदीप्यमान यशाच्या ‘चंद्र’कला

एकविसावे शतक सुरू होताच जगात चंद्र–शर्यतीची नवी मालिका सुरू झाली. याचे एक श्रेय भारताला देता येईल. कारण ऑक्टोबर २००८ मध्ये प्रथमच भारताचे चांद्रयान–१ प्रक्षेपित झाले आणि चंद्राच्या कक्षेत पोहोचल्यानंतर या यानाने अशी अनेक निरीक्षणे दिली, ज्यामुळे चंद्राला पुन्हा गवसणी घालण्याच्या जगाच्या आकांक्षा जागृत झाल्या. गेल्या काही वर्षांत अनेक देशांनी चंद्राला गवसणी घालण्यासाठीच्या मोहिमांची सुरुवात केली; पण भारताच्या चांद्रयान ३ मोहिमेचे यश हे चिरंतन आहे. त्यामुळेच अत्यंत कमी खर्चात साध्य केलेल्या या दुर्मिळ यशाबाबत इस्रोच्या वैज्ञानिकांसह या मोहिमेशी संबंधित अंतराळ संशोधक आणि अन्य सर्व घटकांचे जगभरात कौतुक होत आहे.

रुपेरी चंद्राला स्पर्श करण्याची इच्छा मानवसमूहामध्ये शतकानुशतके आहे. अवकाशाच्या चार भिंती ओलांडून चंद्राला स्पर्श करता येतो हे लक्षात आल्यावर विज्ञान आणि अवकाशाशी संबंधित माहितीने या आकांक्षांना नवे पंख दिले. त्याच्यापर्यंत वाहने पोहोचवता येतात, माणसांना त्याच्या भूमीवर उतरवता येते यांसारख्या भन्नाट आणि अशक्यप्राय वाटणा–या संकल्पना मानवी मेंदूतून बाहेर येऊ लागल्या. अवकाश संशोधकांनी, वैज्ञानिकांनी त्यांना विज्ञान–तंत्रज्ञानाची जोड दिली आणि ही दोन्ही उद्दिष्टे सुमारे साडेपाच दशकांपूर्वीच साध्य झाली. २० जुलै १९६९ पा–सून अमेरिकन अंतराळ एजन्सी– नासाच्या अंतराळवीरांनी चंद्रावर उतरण्याची जी मालिका सुरू केली होती ती सहा यशस्वी अपोलो मोहिमांमध्ये एकूण १२ प्रवाशांना चंद्रावर उतरवून संपुष्टात आली होती.

या मोहिमांमुळे चंद्राविषयी आणखी काही जाणून घेण्याची इच्छा राहिलेली नव्हती. तसेच शास्त्रज्ञांना किंवा प्रवाशांना पुन्हा चंद्रावर जाऊन नव्याने संशोधन करण्याविषयीचे प्रयत्नही थंडावले होते. पण एकविसावे शतक सुरू होताच जगात चंद्र–शर्यतीची नवी मालिका सुरू झाली. याचे एक श्रेय भारताला देता येईल. कारण ऑक्टोबर २००८ मध्ये प्रथमच भारताचे चांद्रयान–१ प्रक्षेपित झाले आणि चंद्राच्या कक्षेत पोहोचल्यानंतर या यानाने अशी अनेक निरीक्षणे दिली, ज्यामुळे चंद्राला पुन्हा गवसणी घालण्याच्या जगाच्या आकांक्षा जागृत झाल्या. आता दुस–यांदा भारतीय अंतराळ संस्था–इस्रोचे चांद्रयान–३ चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीरीत्या उतरले आहे. हे एक ऐतिहासिक आणि देदीप्यमान यश आहे, यात शंकाच नाही; पण त्याचवेळी चंद्रावरून आपल्याला खरोखर काही नवीन मिळणार आहे का, असा प्रश्न पुन्हा उपस्थित केला जात आहे. अलीकडच्या वर्षांत केवळ भारतच नाही तर शेजारील चीन, जपान, इस्रायलसह अनेक देशांनी चंद्राला गवसणी घालण्यासाठी आपल्या अंतराळ मोहिमा राबवल्या आहेत; तसेच अनेक देश यासाठीच्या तयारीत गुंतलेले आहेत. यामध्ये अमेरिकन स्पेस एजन्सी – नासाच्या योजना सर्वांत लक्षणीय आहेत. नासाने पुन्हा एकदा मानव–ला चंद्रावर उतरवण्याची मोहीम सुरू केली आहे.

त्यानुसार २०२४ किंवा २०२५ मध्ये तीन प्रवासी चंद्राच्या पृष्ठभागावर उतरू शकतात. आज भारताच्या चांद्रयान–३ ने जिथे पाऊल रोवले आहे तिथे म्हणजेच चंद्राच्या त्याच दक्षिण ध्रुवावर अमेरिकेचा कट्टर प्रतिस्पर्धी असणा–या रशियानेही आपले वाहन लुना–२५ उतरवण्याचा प्रयत्न केला. या मोहिमेमधून रशियाला हे सिद्ध करायचे होते की, युक्रेनसोबत गेल्या दीड वर्षापासून सुरू असलेल्या सततच्या युद्धानंतरही रशिया कुठेही कमजोर झालेला नाही. पण आंतरराष्ट्रीय समुदायाला कोणताही सकारात्मक संदेश देण्यात रशिया अपयशी ठरला. २० ऑगस्ट २०२३ रोजी रशियाचे वाहन अपघातग्रस्त झाले आणि चंद्रावर उतरण्याचे रशियाचे स्वप्न भंगले. भारतालाही २०१९ मध्ये चंद्राशी संबंधित योजनेमध्ये एक धक्का बसला होता. सप्टेंबर २०१९ मध्ये पाठवलेले चांद्रयान–२ चे लँडर ‘विक्रम’ आणि रोव्हर ‘प्रज्ञान’ चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग करू शकले नव्हते. यामुळे हे मिशन अयशस्वी झाले. पण यामुळे भारताचा उत्साह कमी झाला नाही. चांद्रयान–२ च्या उद्दिष्टांच्या पुढे जात, त्यातील उणिवांचा, कमतरतांचा अभ्यास करत इस्रोने चांद्रयान–३ चे शिवधनुष्य पेलण्याचे ठरवले. विशेष म्हणजे अतिशय कमी खर्चात ही मोहीम यशस्वी करण्यात आली. आता चांद्रयान–३ च्या यशस्वी लँडिंगनंतर हे मिशन चांद्रयान–२ ची अपूर्ण कामेही पूर्ण करेल अशी अपेक्षा आहे.

गेल्या पाच दशकांत असे काय घडले की ज्यामुळे चंद्राविषयीचे जगाचे आकर्षण वाढले? खरे तर जगातील वैज्ञानिकांचे डोळे आता चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर लागले आहेत. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर अंधारात नेहमी दिसणा–या खड्ड्यात (क्रेटर्समध्ये) पाणी साठलेले असू शकते. हे पाणी भविष्यात रॉकेट इंधन म्हणून वापरले जाऊ शकते. असे मानले जाते की चंद्राच्या या भागात आढळणारे पाणी सौरयंत्रणेच्या विविध भागांमध्ये पाठवलेल्या मोहिमांच्या रॉकेटसाठी इंधन पुरवण्याचे साधन बनू शकते. नासाच्या आकलनानुसार, चंद्रावर ६०० दशलक्ष टन पाणी गोठलेल्या बर्फाच्या रूपात आहे. चंद्रावरील या पाण्याचे विघटन करून, त्यातून मिळणारा हायड्रोजन इतर ग्रहांवर जाणा–या रॉकेटसाठी इंधन म्हणून वापरला जाऊ शकतो. त्यानुसार दूर अंतराळ प्रवासासाठी चंद्र हा थांबा म्हणून वापरला जाऊ शकतो आणि तेव्हा पाण्यापासून बनवलेले रॉकेट इंधन अधिक उपयुक्त ठरू शकते. पृथ्वीवरून प्रक्षेपित केलेल्या रॉकेटची बहुतांश ऊर्जा या ग्रहाच्या वातावरणातून आणि गुरुत्वाकर्षणातून बाहेर पडण्यासाठी खर्च होते. अशा परिस्थितीत, जर चंद्रावरील इंधन भरणारी केंद्रे (रिफ्युलिंग स्टेशन) सूर्यमालेतील इतर ग्रहांपर्यंत पोहोचण्यासाठी अवकाशयानाच्या रॉकेटला इंधन पुरवू शकली तर हा करिश्मा अवकाश संशोधनाला आणि अवकाश मोहिमांना नवा आयाम देणारा ठरेल.

# नारी शक्तीचा गौरव



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या ‘मन की बात’मध्ये नारी शक्तीचा गौरव केला. त्यांनी सांगितले की, चांद्रयान मोहिमेमुळे भारताचा जगात गौरव झाला आणि तो गौरव नारी शक्तीमुळेच भारताला लाभला. जेव्हा नारी शक्तीचे अधिष्ठान असते तेव्हा कोणताही कार्यक्रम, मिशन यशस्वी होतेच, हे जगमान्य झालेले सत्यच तर मोदी यांनी सांगितले. चांद्रयान मोहिमेत सहभागी झालेल्या पथकात कित्येक स्त्रिया, महिला अभियंता वगैरे होत्या. त्याचा गौरवपूर्वक उल्लेख मोदी यांनी करून भारत नारी शक्तीला किती आदर देतो, हेच अधोरेखित केले. भारतात प्रथमपासून नारी शक्तीचा गौरव केला जात आहे. अगदी पुरातन काळात जायचे म्हटले तर गार्गी, मैत्रेयी यांनी शंकराचार्यांना वादात हरवले होते, तर अकबराच्या दरबारात प्रसिद्ध असलेला गायक तानसेन याची मुलगी ताना रिरीने त्याला साथ देऊन बादशहाच्या गैरमर्जीपासून वाचवले होते. अशी कितीतरी उदाहरणं देता येतील की महिलांनी पुढे येऊन भारताची शान वाढवली आहे.

भारतीय हवाई दलात तर आता महिलांना प्रवेश मिळाला आहे. पण तेथेही महिलांनी जोरदार कामगिरी करून देशाच्या हवाई दला–ची प्रतिष्ठा वाढवली आहे.आपल्याकडे महिलांना सन्मानाने वागवण्यात येत आहे, त्याची किती उदाहरणे म्हणून सांगावीत. इंग्लंडमध्ये देखील महिलांना मताधिकारासाठी झगडावे लागले होते. आपल्याकडे बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या द्रष्ट्या नेत्यामुळे महिलांना सुरुवातीपासून मताधिकार प्राप्त झाला होता. इतकेच नव्हे तर सर्व मतांचे मूल्य समान ठेवण्याचे अभिमानास्पद कामही बाबासाहेबांनी केले. ही जी परंपरा आहे तिचेच उदात्तीकरण मोदी यांच्या परवाच्या ‘मन की बात’मध्ये दिसले. त्यांनी चांद्रयानच्या यशात महिलांचा वाटा असल्याचे आवर्जून सांगितले. मोदी यांनी चांद्रयान मोहिमेला बळ तर दिलेच आणि प्रेरणाही दिली. पण मोदी यांनीच नारी शक्तीचा गौरव केल्याने आता स्त्रियाही विज्ञान शाखेकडे मोठ्या संख्येने वळतील.

महिला या विज्ञानात मागे नसतात, हा फार मोठा संदेश मोदी यांनी नारी शक्तीचा गौरव करून दिला आहे. ज्या देशात पूर्वी महिलांवर पुरुष वर्गाकडून प्रचंड अत्याचार झाले, त्या वर्गात महिलांची स्थिती आता किती कमालीची सुधारली आहे, हे पाहून स्तिमित व्हायला होते. महिलांच्या विद्रूपीकरणाची कुप्रथा कधीच थांबली. पण त्यानंतरही महिलांचा सन्मान करून त्यांना त्यांच्या कार्याचे योग्य श्रेय देण्याची वहिवाट भारतात चालत आली आहे. मोदी यांनी नारी शक्तीचा जो गौरव केला, त्यामागे ही फार मोठी परंपरा आहे. त्याच परंपरेचे पाईक मोदी आहेत. विरोधक केवळ आपण फार मोठे स्त्री शक्तीचा गौरव करणारे आहोत, असे सांगत असतात. पण काँग्रेसच्या काळात स्त्रियांवर अनेक अत्याचार करण्यात आले.

दिल्लीतील निर्भयाप्रकरण तर अगदी अलीकडचे. पण तेव्हा दिल्लीत मनमोहन सरकार होते. ते लेचेपेचे नसते तर गुन्हेगारांची असले क्रौर्य दाखवण्याची हिंमतच झाली नसती. दिल्लीला आता तर रेप कॅपिटल म्हणून ओळख–ले जाते. हे पाप दिल्लीतील अरविंद केजरीवाल आणि काँग्रेसच्या पूर्वीच्या सरकारांचे आहे. केवळ विरोधकांना दोष देण्यासाठी हे विवेचन केले नाही, तर वस्तुस्थिती सांगितली आहे. अजूनही तालिबानी मानसिकतेत काँग्रेस आहे. दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांनी शाहबानो प्रकरणात अल्पसंख्याक पुरुषांना खूश करण्यासाठी चक्क सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय फिरवला. तो निश्चितच नारी शक्तीचा गौरव नव्हता, तर नारी शक्तीला दाबणे होते. तेच काम मोदी यांनी तिहेरी तलाकची कुप्रथा बंद करून नव्याने नारी शक्तीला प्रोत्साहन दिले. केवळ हिंदू स्त्रीचाच नव्हे तर अल्पसंख्याक समाजातील महिलांचा आपण आदर करतो, हे मोदींनी कसलीही बडबड न करता दाखवून दिले. आजही काँग्रेसवाले मात्र अल्पसंख्याक नाराज होऊ नयेत म्हणून तिहेरी तलाकची कुप्रथा बंद करून का संकटातून अल्पसंख्याक महिलांची सुटका केली म्हणून मोदी यांच्यावर आगपाखड करत असतात. नारी शक्तीचा आविष्कार प्रत्येक बाबतीत आज देशात दिसतो आहे.

आज महिला किती मनमोकळेपणाने वावरत असतात. बैठकांमध्ये महिला अधिकारारूढ होऊन चर्चा करत असतात. हे चित्र दिसेल, असे पन्नास वर्षांपूर्वी कुणी कल्पना तरी केली असेल काय? त्याचे उत्तर नाही असे आहे. नारी शक्ती आज सर्वत्र नवीन झेंडे गाडत आहे. चंद्रावरही याच नारी शक्तीने झेंडा रोवला आहे. महिलांचा गौरव करतानाच पंतप्रधान मोदी यांनी नेहमीप्रमाणे आपली खेळात असलेली रुचीही दाखवली. विद्या–पीठ स्पर्धेत गौरवशाली ठरलेल्या महिला खेळाडूंशी त्यांनी संवाद साधला आणि क्रीडा क्षेत्र किती महत्त्वाचे आहे, हेच दाखवून दिले. त्याबाबतही मोदी यांचे आभार क्रीडाप्रेमी देशाने मानले पाहिजेत.

महिला खेळाडूंची थेट संवाद साधून त्या प्रेरणा देण्याचे कार्य मोदी यांनी याही वेळी ‘मन की बात’मध्ये करून महिला खेळाडूंना नवी प्रेरणा दिली. यातून काँग्रेसच्या काळात जितक्या पदकांची संख्या असे, त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त पदके या खेळाडूंनी एकाच वर्षात कशी मिळवून दिली, याचा मोदी यांनी गौरवपूर्ण उल्लेख करून काँग्रेसने खेळाडूंची कशी गळचेपी चालवली होती, याचे माप काँग्रेसच्या पदरात पुरेपूर टाकले. ते आवश्यकच होते. कारण त्याशिवाय देशाला वस्तुस्थिती समजली नसती. मोदी यांनी याही ‘मन की बात’मध्ये खेळाडू आणि नारी शक्ती यांना प्रेरणा देऊन एक प्रेरणादायी कार्य पुढे सुरू ठेवले आहे. मोदी यांची करावी तितकी प्रशंसा थोडीच आहे.

# गोव्याच्या पर्यटन उद्योग क्षेत्रावर सकारात्मक परिणाम

सध्याचे जग हे विविध मार्गांनी परस्परांसोबतची जोडणी आणि जागतिक सहकार्याचे आहे. सध्याच्या अशा जगात, जी–२० सारखे आंतरराष्ट्रीय मंच कोणत्याही देशाच्या विकासाच्या वाटचालीला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यादृष्टीने पाहिले तर सध्या जी–२० समूहाचे अध्यक्षपद भारताकडे असणे हे आपल्या देशासाठी, विशेषत: पर्यटन उद्योगाच्या भरभराटीसाठी प्रसिद्ध असलेल्या गोव्यासारख्या राज्यासाठी अत्यंत महत्त्वाचेच आहे.

गोवा हा गेल्या अनेक दशकांपासून पर्यटकांसाठी आकर्षणाचा प्रदेश राहिला आहे. इथल्या पर्यटनाला चालना देण्यासाठी सध्या ‘गोवा बियॉन्ड द बीच’ हा उपक्रमही राबवला जात आहे. या उपक्रमामुळे पर्यटकांमधले गोव्याच्या नैसर्गिक सौंदर्याबाबतचे आकर्षण हे सूर्यप्रकाशाने उजळून निघालेल्या समुद्रकिनाऱ्यांच्याही पलीकडे पोहोचले आहे. या उपक्रमामुळे गोव्यातला समुद्रकिनाऱ्यांपलीकडचा इथल्या हिरव्यागार डोंगराळ भागांचा, शांतमय बॅकवॉटर्स, वैविध्यपूर्ण वन्यजीवांचे अस्तित्व असलेली अभयारण्ये आणि विविध स्थानिक बाजारपेठांसारखा दृष्टिआड गेलेला खजिना उलगडून समोर येऊ लागला आहे. पर्यटकांना इथल्या बाजारपेठांमध्ये राज्याची अस्सल चव, आणि इथली कारागिरी अनुभवायला मिळू लागली आहे.

सातत्याने आणि झपाट्याने बदलत असलेल्या या जगात जी–२०चे अध्यक्षपद स्वीकारताच भारताने जगाला, आ–पली आर्थिक क्षमता, धोरणात्मक सामर्थ्य आणि सांस्कृतिक विविधता दाखविण्याची संधीही अगदी नियोजनपूर्वक साधली. या अध्यक्षपदामुळे अवघ्या जगाचे लक्ष भारताकडेच लागून राहिलेले आहे आणि त्यामुळेच गोवादेखील अगदी नकळत प्रकाशझोतात येऊ शकला. याचे स्वाभाविक कारण म्हणजे या काळात गोव्यात जी–२० अंतर्गतच्या इतर अनेक बैठकांचे आयोजन तर केले गेलेच, पण त्यासोबतच भारताची पर्यटन राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोव्यात जी–२० समूहाच्या पर्यटन कार्यकारी गटाची महत्त्वाची बैठक आणि मंत्रिस्तरीय बैठकदेखील आयोजित केली गेली.

जी–२० शिखर परिषदेच्या निमित्ताने देशात येणाऱ्या विविध देशांचे नेते, राजनैतिक अधिकारी आणि प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना गोव्याचे नैसर्गिक सौंदर्य, इथली प्राचीन मंदिरे, मशिदी, पोर्तुगीजांच्या काळातली अनेक अद्वितीय वारसा घरे, तसेच चर्चपासून ते इथली बहुसांस्कृतिक खाद्यसंस्कृती आणि पाककला, इथल्या रूढी आणि परंपरांपर्यंत व्यापक सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवण्याची अनोखी संधी गोव्याला मिळाली. या सगळ्याला प्रसारमाध्यमांनी दिलेली व्यापक प्रसिद्धी आणि राजनैतिक अधिकाऱ्यांनी दाखवलेला रस यामुळे जागतिक पा–तळीवर गोव्याला मोठी प्रसिद्धीही मिळाली. स्वाभाविकपणे यामुळे जी–२० च्या आनुषंगाने होत असलेल्या चर्चांसोबतच, गोव्याचा स्थायीभाव असलेल्या आदरातिथ्याकडेही जी–२०च्या निमित्ताने आलेल्या पाहुण्यांचे लक्ष वेधले गेले आणि पाहुण्यांची मनेही जिंकली.

गोव्यात झालेल्या जी–२० पर्यटनविषयक कार्यकारी गटाच्या तसेच मंत्रिस्तरीय बैठकीतही गोव्याच्या पर्यटन आराखड्याला मान्यता मिळाली. या आराखड्याला सर्व भागधारकांनी पाठिंबाही दर्शवला तसेच शाश्वत पर्यटनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी दृढ वचनबद्धताही दर्शवला. आता गोव्याचा पर्यटनविषयक आराखडा अगदी जोरदारपणे राबवला जात आहे. या आराखड्यात प्रामुख्याने पाच प्राधान्यक्रमांचे मुद्दे ठरवले गेले आहेत. यात शाश्वत पर्यटन/हरित पर्यटन, डिजिटलायझेशन, कौशल्य विकास, पर्यटनविषयक सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग तसेच पर्यटन स्थळांचे व्यवस्थापन या मुद्द्यांचा समावेश आहे. खरे तर या आराखड्याच्या या पाच मुख्य स्तंभाना बळकटी देण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतील अशी विविधांगी धोरणे गोव्या सरकारच्या वतीने या आधीपासूनच राबवली जात आहेत. यात होमस्टे धोरणासह, काराव्हॅन धोरण आणि येऊ घातलेल्या कृषी पर्यटन धोरणाचा समावेश आहे.

शाश्वत विकासासाठीच्या ध्येय उद्दिष्टांना सोबत घेऊन वाटचाल करण्याच्या दृष्टीने जी–२० समूहातील देशांसह इतर देशांची सरकारे तसेच पर्यटन उद्योगक्षेत्रातील इतर कंपन्यांना या क्षेत्रा–तील क्षमतेचा लाभ घेण्यासाठी, इच्छेनुसार साधनसंपत्ती उपलब्ध करून देणे हाच गोव्याच्या पर्यटनविषयक आराखडा अर्थात ‘गोवा रोडमॅप फॉर टुरिझम’चा मुख्य उद्देश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या लाइफस्टाइल फॉर एन्व्हायर्नमेंट अर्थात लाईफ या चळवळीला पुरक ठरू शकेल या आनुषंगाने आणि पर्यटकांना आयुष्यभरातील आठवणीतल्या प्रवासाचा अनुभव देऊ शकेल, अशा प्रकारच्या पर्यटनकेंद्री उपक्रमांना चालना देण्यावर या आराखड्यात भर दिला गेला आहे.

जी–२० च्या गोव्यात झालेल्या बैठकांमुळे, बैठका, चालनावर्धक उपक्रम, परिषदा आणि प्रदर्शनविषयक पर्यटनासाठी गोव्यात असलेल्या पायाभूत सुविधा आणि पुरक व्यवस्थांच्या जाळ्याविषयीची माहिती जगासमोर आली, स्वाभाविकपणे यामुळे गोवा हे बैठका, चालनावर्धक उपक्रम, परिषदा आणि प्रदर्शनविषयक पर्यटनाच्या बाबतीत देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय कंपन्यांसाठी पसंतीचे ठिकाण म्हणून लक्षात राहायला मदत होणारआहे.

जी–२० च्या गोव्यातल्या बैठकांच्या वेळी राज्यात जगभरातले नेते आणि मान्यवर उपस्थित राहणार होते, त्यांच्या स्वागताची तयारी म्हणून राज्यभरातल्याविमानतळ, रस्ते आणि निवास सुविधांच्या सोबतच राज्याच्या इतर आवश्यक पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यावर पुन्हा एकदा भर दिला गेला. या बैठकांच्या निमित्ताने राज्यातल्या पायाभूत सुविधांमध्ये घडून आलेल्या सुधारणांमुळे जी–२० शिखर परिषदेसाठी आवश्यक सुविधांची पूर्तता करता आलीच, पण त्यामुळेच भविष्यात राज्यात येणाऱ्या पर्यटकांना, एका उत्तम पर्यटनस्थळाचा अनुभव मिळेल याचीही तजवीज झाली.

यासोबतच या पायाभूत सुविधांमुळे गोव्याची राज्यांतर्गत आणि देशाच्या इतर भागांसोबतची परस्पर जोडणी आणि संपर्क वाढला, त्यामुळे देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी गोव्यात ये–जा करणेही अधिक सुलभ झाले आहे. जी–२० च्या निमित्ताने राज्याची हवाई प्रवासाबाबतची परस्पर जोडणी अधिक सुधारल्यामुळे या परिषदेसाठी येणाऱ्यांची सोय तर झालीच, पण त्यासोबतच, आराम करण्यासह, साहसी पर्यटन एकाच ठिकाणी करता येईल अशा ठिकाणाच्या शोधात असलेल्या पर्यटकांनाही यादृष्टीने अधिक सोयीस्कर असे गोव्यासारखे नवे ठिकाणही मिळाले. या सगळ्याच्या बरोबरीनेच राज्याला ‘देखो अपना देश’ या मोहिमेचा राज्यांतर्गत आणि राज्याशी जोडलेल्या ठिकाणांच्या आनुषंगानेही प्रचार प्रसारही करता आला.

भारताकडे आलेल्या जी–२०च्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात, शाश्वतता आणि पर्यावरण संवर्धनाच्या संकल्पनांवर व्यापक चर्चा करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली. महत्त्वाचे म्हणजे या संकल्पना गोव्याच्या पर्यटनविषयक दीर्घकालीन उद्दिष्टांशी सुसंगतच आहेत. या परिषदेच्या निमित्ताने जागतिक नेत्यांनी जगासमोरची आव्हाने, शाश्वत पर्यटन पद्धती यावर विस्तृत चर्चा केली. त्यामुळे स्वाभाविकपणे विकासाची जबाबदारीपूर्वक प्रक्रिया राबवण्याची गरजही अधोरेखीत झाली. या बैठकांमध्ये पर्यावरणविषयक जाणिवांवर भर दिला गेला. खरे तर ही बाब गोवा सरकारकडून गोव्याच्या अंतर्गत भागात समूह पर्यटनाशी जोडून, पर्यावरण संवर्धनासह पर्यटन वाढीसाठीच्या प्रयत्नांत समतोल राखण्यासाठी राबवल्या जात असलेल्या उपाययोजनांशी सुसंगतच होती. यामुळे गोव्यातील नद्यांसह इथले पर्यटनविषयक वैविध्यपूर्ण अंतरंग अनुभवण्यासाठी मोठ्या प्रमाणात काँक्रीटच्या वापराची गरजच उरत नाही.

गोवा हे एका अर्थाने भारताची वैविध्यपूर्ण संस्कृती आणि इथल्या परंपरेचे एक प्रकारचे छोटे रूपच आहे. आणि हेच रूप जगासमोर आणण्याची मोठी संधी जी–२० परिषदेने उपलब्ध करून दिली आणि त्याद्वारे परस्पर सांस्कृतिक देवाण–घेवाण आणि संवादासाठी एक अनोखे व्यासपीठही उपलब्ध करून दिले. जी–२० च्या निमित्ताने गोव्यात झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून, इथली कलात्मक प्रतिभा, स्थानिक कारागिरी आणि पाकसंस्कृतीचा अनुभव आंतरराष्ट्रीय समुदायाला घेता आला. सांस्कृतिक देवाण–घेवाणीच्या बाबतीत वाढलेल्या उत्सुकतेने गोव्याच्या पर्यटन क्षेत्रातही वैविध्यता आली. समुद्रकिनारे आणि नाईटलाईफच्या पलीकडे जात इथे येणारे पाहुणे हे स्थानिक समुदायांशी संवाद साधता येऊ शकेल, त्यांच्या प्रथा पारंपरा जाणून घेता येऊ शकेल, साओ जोआओ – चिकालो अशा राज्यातल्या चैतन्यपूर्ण उत्सवी सोहळ्यांमध्ये रमून जाता येऊ शकेल अशा प्रकारचा निर्भेळ आनंद अनुभवण्याचा प्रयत्न करू लागले. एका अर्थाने केवळ प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन घडवण्याच्या पारंपरिक पर्यटन धोरणाए–`वजी, प्रायोगिक पर्यटनाकडे लक्ष देण्याच्या दिशेने झालेल्या या

# कॅन्सरमुळे कापावी लागली जीभ, तरीही बोलू लागली महिला, डॉक्टरही धक्क्यात!

मुंबई, १३ एप्रिल : कॅन्सर अर्थात कर्करोग हा गंभीर स्वरूपाचा आजार आहे. कॅन्सरवर वेळीच उपचार केले तर रुग्णाला काही अंशी दिलासा मिळू शकतो; पण कॅन्सर गंभीर पातळीवर पोहोचला असेल तर उपचार लागू पडतातच असं नाही. अशा वेळी क्वचितच एखाद्या रुग्णाबाबत चमत्कार घडू शकतो. ब्रिटनमधल्या एका कॅन्सरग्रस्त महिलेच्या बाबतीत असा प्रकार घडला. या महिलेला जीभ आणि घशाचा दुर्मीळ कॅन्सर झाला होता. आजार बळावला असल्याने डॉक्टरांनी या महिलेची जीभ सर्जरी करून काढून टाकली. हातावरची त्वचा आणि पेशींपासून नवी जीभ तयार करून ती या महिलेला बसवली गेली. सर्जरीनंतर ही महिला बोलू शकणार नव्हती; पण अचानक ती महिला बोलू लागली. ही स्थिती चमत्कारापेक्षा वेगळी नव्हती. या महिलेची कहाणी जाणून घेऊ या.ब्रिटनमधल्या एक कॅन्सरग्रस्त महिलेच्या आयुष्यात चमत्कार घडला आहे. यामुळे तिच्यासह तिच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टर्सनाही आश्चर्याचा धक्का बसला आहे. गेमा विक्स असं या महिलेचं नाव आहे. गेमाला सहा वर्षांपासून जिभेसंबंधी त्रास जाणवत होता. तिच्या जिभेवर पांढरा डाग होता. नंतर त्या जागी खड्डा पडला. वेदनांमुळे गेमाला खाणंदेखील मुश्किल झालं होतं. डॉक्टरांनी तपासणी केली असता तिला जीभ आणि घशाचा चौथ्या स्टेजचा कॅन्सर असल्याचं स्पष्ट झालं. ऋजीव वाचवण्यासाठी जीभ काढून टाकणं गरजेचं आहे. जीभ काढल्यावर बोलता येणार नाही,ऋ असं डॉक्टर्सनी गेमाला सांगितलं. हे ऐकल्यावर गेमा घाबरून गेली



आणि तिला जबर मानसिक धक्का बसला; पण याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही हे समजल्यावर गेमा सर्जरीसाठी तयार झाली. डॉक्टरांनी सर्जरी करून तिची ९० टक्के जीभ काढून टाकली. त्यानंतर तिच्या हाताची त्वचा आणि पेशींपासून नवीन जीभ तयार करून ती बसवण्यात आली. ही जीभ केवळ नावापुरतीच आहे. तिच्या साह्याने तिला बोलता येणार नाही, ही गोष्ट डॉक्टर्सना माहिती होती. सर्जरीनंतर गेमा अजिबात बोलू शकत नव्हती; पण एक दिवस तिच्या तोंडातून अचानक शब्द बाहेर पडले. आपण बोलू शकतो, यावर तिचा विश्वास बसत नव्हता. हे दृश्य पाहून डॉक्टरांनादेखील आश्चर्याचा धक्का बसला. गेमाने सांगितलं, की ऋजेव्हा मी ऑपरेशननंतर पहिल्यांदा शब्द उच्चारले तेव्हा हा माझा आवाज आहे यावर विश्वास बसत नव्हता. माझा आवाज खूप बदलला होता. तो अस्पष्ट होता. ऑपरेशननंतर एक दिवस माझा पार्टनर आणि मुलगी हे दोघं मला भेटायला रुग्णालयात आले. त्यांना पाहताच माझ्या तोंडातून 'हॅलो' हा शब्द उच्चारला गेला. ते ऐकून डॉक्टर्सना आश्चर्याचा धक्का बसला. ऑपरेशननंतर आता मी बोलायची हळूहळू प्रॅक्टिस करत आहे. इतरांना मी उच्चारलेले शब्द हळूहळू समजायला लागले आहेत. यात मला आणखी सुधारणा करायची आहे.ऋ

# नजर तीक्ष्ण असेल तर खडकात लपलेलं हरीण शोधून दाखवा

मुंबई, १३ एप्रिल: मेंदूला ताण देण्याची सवय असावी, या उद्देशाने ऑप्टिकल इल्युजन अर्थात दृष्टिभ्रम असलेली चित्रं तयार केली जातात किंवा फोटोज शेअर केले जातात. ऑप्टिकल इल्युजन असलेली चित्रं अशा प्रकारे सेट केली जातात, की त्यात लपवलेली गोष्ट शोधण्यात माणूस गोंधळून जातो आणि अखेरीस त्याचा मेंदू थकतो. काही वेळा कॅमेऱ्यात टिपली गेलेली छायाचित्रंही डोळ्यांची दिशाभूल करतात. यावेळी असाच एका आव्हानात्मक फोटो शेअर करण्यात आला आहे. या फोटोत लपलेला प्राणी अगदी समोर आहे; पण तो सहजासहजी दिसणार नाही. फोटोत दडलेला प्राणी शोधण्याचं आव्हान दर वेळेप्रमाणेच खूप मजेशीर असेल. ऋमाइंड ऑडिटीजऋने ऑप्टिकल इल्युजन असलेला एक फोटो शेअर केला आहे. या फोटोत लपलेल्या हरणाचा शोध घेणं म्हणजे समुद्रात सुई शोधण्यासारखं आहे. खूप विचार करून हे चॅलेंज पूर्ण करावं लागणार असणार असल्याने यामुळे कदाचित मेंदू थकून जाईल; मात्र हे चॅलेंज पूर्ण करण्यासाठी फक्त दहा सेकंदांचा वेळ देण्यात आला आहे.खडकांमध्ये लपलं आहे हरीण आव्हान म्हणून सादर करण्यात आलेलं हे चित्र एका खडकाचं आहे. या खडकाच्या आजूबाजूला सुकलेली काही झाडं दिसतील. त्यात एका झाडाला काही पानं शिल्लक आहेत. यात तुम्हाला एक प्राणी शोधायचा आहे. हा प्राणी खडकाच्या अगदी समोर असू शकतो. हा प्राणी म्हणजे हरीण असून, त्याला शोधण्यासाठी फक्त दहा सेकंदांचा अवधी देण्यात आला आहे. तुम्ही स्वतःला सर्वांत हुशार, समुजदार आणि चलाख समजत असलात, तर दिलेल्या वेळात खडकात लपलेलं हरीण शोधून दाखवा. हे हरीण समोर असूनही तुम्हाला सहजपणे दिसणार नाही.



हरणाला शोधण्याच्या प्रयत्नात गोंधळ खडकावरचं हरीण शोधण्याचं हे आव्हान आहे. खडकात लपलेलं हरीण शोधण्यासाठी तुम्हाला फोटोच्या मध्यभागी लक्ष केंद्रित करावं लागेल. हरणाचा आणि खडकाचा रंग एकसारखाच आहे, ही गोष्टही लक्षात घेतली पाहिजे. त्यामुळे ते शोधताना तुमची दमछाक होऊ शकते. तुमची नजर तीक्ष्ण असली, तर तुम्हाला हरीण लगेच दिसेल. हे हरीण फोटोच्या अगदी मधोमध थोडं खालच्या बाजूला उभं आहे. ज्यांना हे आतापर्यंत आव्हान वाटत होतं, त्यांनी फोटो बारकाईने पाहावा. त्यात लाल खूण केलेल्या ठिकाणी पाहिल्यास हरिण दिसेल. हे आव्हान अगदी सोपं वाटत असलं, तरी ते तितकं सोपं नाही. कारण फोटोत दिसणारे खडक, झाडं आणि हरणाच्या त्वचेचा रंग काहीसा सारखाच आहे.

# पुरुषांनी उभं राहून लघवी करावी की बसून? जाणून घ्या योग्य पद्धत

मुंबई, १३ एप्रिल : अनेकदा असं शिकवलं जातं की पुरुषांनी बसून लघवी न करता उभं राहून लघवी करावी. पण खरंच उभं राहून लघवी करणं पुरूषांसाठी चांगलं असतं की बसून लघवी करणं? असा प्रश्न बहुतांशवेळा उपस्थित करण्यात येतो. याबाबतच आज आम्ही तुम्हाला माहिती देणार आहोत. कदाचित हे पटकन तुम्हाला पटणार नाही, किंवा व्यावहारिक वाटणार नाही. मात्र तुम्हाला माहिती आहे का, पुरुषांनी उभं राहून लघवी करण्यापेक्षा बसून लघवी करणं हे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने फायद्याचं आहे. 'आज तक'ने याबाबत वृत्त दिलंय.पुरुष अनेकदा उभं राहून लघवी करतात. सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्येही पुरुषांना उभं राहूनच लघवी करण्याचा पर्याय असतो. काही काळापूर्वी तज्ज्ञांनी पुरुषांना उभे राहून लघवी करण्याबद्दल इशारा दिला होता. तज्ज्ञांच्या मते, 'पुरुषांनी उभे राहण्याऐवजी बसून लघवी करावी. बसून लघवी करण्याची सवय असेल तर त्याचे अनेक फायदे मिळू शकतात.'नेदरलँड्समधील डॉक्टरांना असं आढळून आलं आहे की,'लघवी करण्यासाठी बसणे पुरुषांसाठी, विशेषतः ज्यांना प्रोस्टेटच्या समस्या आहेत त्यांच्यासाठी खूप



फायदेशीर ठरू शकते. कारण उभं राहण्याऐवजी बसून लघवी जास्त जोराने बाहेर पडते.' भारतात पूर्वीच्या काळातील बहुतांश पुरूष बसून लघवी करायचे पण नंतर समाजातच ही पद्धत बदलत गेली....तर मूत्राशयात तयार होतात खडे 'एनएचएस'च्या मते, 'लघवी करताना जर मूत्राशय (ब्लॅडर) पूर्णपणे रिकामे होत नसेल, तर अशावेळी मूत्राशयात खडे तयार होऊ शकतात.' याबाबत तज्ज्ञांनी सांगितलं की, 'मूत्रपिंड तुमच्या रक्तापासून वेगळ्या केलेल्या पाणी आणि टाकाऊ पदार्थांनी बनलेलं मूत्र तयार करतात. टाकाऊ पदार्थांपैकी एक म्हणजे युरिया असून जो नायट्रोजन आणि कार्बन पासून तयार होतो. जर तुमच्या मूत्राशयात थोडीशीसुद्धा लघवी उरली असेल, तर युरियामध्ये असलेली रसायने एकत्र चिकटून क्रिस्टल्स बनतात. कालांतराने, हे क्रिस्टल्स कठोर होतात, ज्यामुळे मूत्राशयात खडे तयार होतात.'...म्हणून बसून लघवी करणं फायद्याचं डॉक्टरांच्या मते, 'जर तुम्ही उभं राहून लघवी करत असाल, तर त्यामुळे तुमच्या ओटीपोटाचे आणि मणक्याचे स्नायू आकुंचन पावतात.' २०१४ च्या अभ्यासात तज्ज्ञांनी सांगितलं की, अनेक वर्षांपासून लोक बसून लघवी करत आहेत. जेव्हा लोक बसतात तेव्हा पेल्विस आणि हिप मसल्सना आराम मिळतो, व यामुळे लघवी करणं सोपं होतं.तज्ज्ञ काय सांगतात? यूसीएलए यूरॉलॉजी विभागातील सहयोगी क्लिनिकल प्राध्यापक डॉ. जेसी एन. मिल्स म्हणाले की, 'बसून लघवी करणं अशा लोकांसाठी एक चांगला पर्याय सिद्ध होऊ शकतो, ज्यांना जास्त वेळ उभं राहण्यात अडचण येते.' ते म्हणाले, 'असे अनेक लोक आहेत, ज्यांना असं वाटतं की उभं राहून लघवी केल्यानंतर त्याचं मूत्राशय पूर्णपणे रिकामं होत नाही. अशावेळी ते बसून लघवी करतात.' एका वेबसाइटशी बोलताना डॉ.मिल्स यांनी सांगितलं की, 'तुम्ही जेव्हा खाली बसता, तेव्हा तुम्ही तुमच्या पोटाच्या स्नायूंचा जास्त वापर करता. त्यामुळे बसून लघवी केल्यानं तुमचं मूत्राशय पूर्णपणे रिकामं होतं. परंतु या संशोधनाचा अर्थ असा नाही की, लघवी करताना प्रत्येकानं बसणं आवश्यक आहे. उभं राहून लघवी केल्यानंतर तुमचं मूत्राशय पूर्णपणे रिकामे होत आहे, असं तुम्हाला वाटत असेल, तर तुम्ही उभं राहूनही लघवी करू शकता. पण जर तुम्हाला तुमचं मूत्राशय लघवी केल्यानंतरही पूर्णपणे रिकामं झालं नाही, असं वाटत असेल तर अशावेळी तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.' तर, प्रसूती आणि स्त्री रोग तज्ज्ञ प्रा.स्टे रगिओस स्टेलिओस डौमोचसिस यांनी सांगितलं की, 'जर तुमचं मूत्राशय पूर्णपणे रिकामं होत नसेल, तर त्यामागे अनेक कारणं असू शकतात.' मूत्राशयात मूत्र राहिल्यास संसर्गामुळे सेप्टिक किंवा किडनी संसर्ग होऊ शकतो. अनेकदा तुम्हाला मूत्राशय रिकामे न होण्याची लक्षणे देखील दिसतात. अशावेळी तुम्ही डॉक्टरांना भेटणं महत्त्वाचं आहे. लघवीचा वेग कमी होणे, लघवी करताना ताण येणे, अधूनमधून लघवी होणे, लघवीला जास्त वेळ लागणे, अशा विविध समस्या तुम्हाला जाणवत असतील, तर अशावेळी तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घेणं महत्त्वाचं आहे.

# अंकशास्त्रानुसार डिसेंबरमध्ये जन्मलेले व्यक्ती असतात भाग्यवान

मुंबई,१३ एप्रिल: अंकशास्त्रात प्रत्येक दिवसाप्रमाणे प्रत्येक महिन्यात जन्मलेल्या लोकांचा स्वभाव आणि व्यक्तिमत्त्वातील फरक सांगितलेला आहे. येथे आम्ही डिसेंबरमध्ये जन्मलेल्या लोकांबद्दल सांगणार आहोत, अंकशास्त्रानुसार ज्यांचा जन्म डिसेंबर महिन्यात झाला ते महत्त्वाकांक्षी स्वभावाचे असतात. तसेच, या लोकांना जीवनात पुढे जायचे आहे, परंतु त्यांच्या तत्त्वांशी तडजोड करत नाहीत. हे लोक प्रतिकूल परिस्थितीत शांत राहतात. तसेच समोरच्या व्यक्तीला ओळखण्याची कला या लोकांकडे असते.थोडे आळशी आणि पुष्कळ आनंदी अंकशास्त्रानुसार डिसेंबरमध्ये जन्मलेले लोक आनंदी असतात. हे लोक आपल्या बोलण्याने समोरच्या व्यक्तीला हसवतात. तसेच, हे लोक मजेदार आहेत. हे लोक गंभीर



वातावरणदेखील आनंददायी करतात. तसेच, या महिन्यात जन्मलेले लोक खूप तत्त्वज्ञानी असतात. बौद्धिकदृष्ट्या ते खूप कार्यक्षम आहेत. ते ज्याही क्षेत्रात पुढे जातात त्याबाबत सखोल ज्ञान ठेवतात. त्याचबरोबर हे लोक आळशी प्रकाराचेही असतात. या कमतरतेमुळे या लोकांना खूप त्रास होतो. हे लोक कोणतेही काम विचार न करता करत नाहीत. त्यापेक्षा काहीही करण्यापूर्वी नीट विचार करा.आर्थिक स्थिती डिसेंबर महिन्यात जन्मलेले लोक त्यांच्या मेहनत आणि क्षमतेच्या जोरावर आयुष्यात चांगले कमावू शकतात. त्यांचे बोलणे प्रभावी असते आणि ते त्यांच्या विचारांनी समोरच्या व्यक्तीलाही प्रभावित करतात. तसेच, हे लोक व्यवसायात चांगले पैसे कमावतात, कारण त्यांच्याकडे ग्राहकांशी व्यवहार करण्याची गुणवत्ता आहे. ज्याचा ते फायदा घेतात. तसेच, हे लोक धोका पत्करण्यातही पुढे असतात. वयाच्या ३० वर्षांच्या आसपास या लोकांचे भाग्य उजळते.शुभ अंक आणि शुभ रंग या महिन्यात जन्मलेल्या लोकांचे भाग्यवान क्रमांक १, ३, ८ आहेत. तसेच या लोकांचे शुभ रंग पिवळे, तपकिरी आणि लाल आहेत. तसेच रविवार आणि बुधवार हे त्यांचे शुभ दिवस असतात.

# घरातील या संकटांमुळे येतो वास्तुदोष, जाणून घ्या प्रत्येक राशीनुसार योग्य उपाय

मुंबई, १३ एप्रिल: घरामध्ये वास्तुदोष आहे की नाही यावरून अनेकदा लोक चिंतेत असतात. घरातील वास्तुदोषांमुळेही जीवनात समस्या निर्माण होतात. जर राशीशी संबंधित गोष्टी घरात ठेवल्या तर जीवनातील सर्व समस्या संपुष्टात येतात. प्रत्येक आघाडीवर यश मिळू शकते. या सामान्यतः साध्या गोष्टी आहेत आणि त्यांचा विशेष वापर आणि देखभाल आश्चर्यकारक आहे. राशीनुसार कोणते उपाय केले पाहिजेत, जेणेकरून घरातील वास्तुदोष दूर होऊ शकतात, हे जाणून घ्या..मेष घरात सूर्यप्रकाश असणे आवश्यक आहे. याकडे जास्तीत जास्त लक्ष द्या. स्वयंपाकघरात आग वापरताना काळजी घ्या.वृषभ घरातील रंग आणि सुगंधांकडे विशेष लक्ष द्या. रंगांचा योग्य वापर केल्यास वास्तुदोष दूर होतात. तसेच घरातील डस्टबिन व्यवस्थित ठेवा.मिथुन घरात हवा खेळती राहील याकडे लक्ष ठेवा. खूप दाट- गर्दीची ठिकाणे टाळा. घरात नेहमी सुगंध ठेवा. कर्क घरातील पाण्याच्या ठिकाणी विशेष लक्ष द्या. पाण्याचा अपव्यय अजिबात करू नका. ईशान्य दिशेला पाण्याची व्यवस्था करा.सिंह घरातील सूर्यप्रकाशाकडे विशेष लक्ष द्या. विद्युत वस्तू आणि स्थानांकडे लक्ष द्या. घरात जास्त अंधार नसावा.कन्या घरामध्ये दक्षिण दिशेकडे विशेष लक्ष द्या. येथे कचरा गोळा करून ठेवू नका. घरातील वस्तू नेहमी योग्य पद्धतीने ठेवा.तूळ घरातील हवेच्या प्रवाहाकडे विशेष लक्ष द्या. घरातील ठिकाणांच्या रंगाकडेही लक्ष द्या. घर नेहमी सुगंधित ठेवा.वृश्चिक घरातील पाण्याच्या ठिकाणांकडे विशेष लक्ष द्या. घरात ओलसरपणा आणि पाण्याची गळती होऊ नये. ईशान्य दिशा स्वच्छ ठेवा. धनु घरात सूर्यप्रकाशाची विशेष काळजी घ्या. यासोबत घराच्या पायऱ्या चांगल्या बनवल्या पाहिजेत. घराच्या मध्यभागी असलेली जागा स्वच्छ ठेवा.मकर घरात




अनावश्यक वस्तू जमा करू नका. स्नानगृह स्वच्छ आणि नीटनेटके ठेवा. कोणतीही निरुपयोगी वस्तू उत्तर दिशेला ठेवू नका. कुंभ घरातील रंग आणि सुगंधांकडे विशेष लक्ष द्या. प्रार्थनास्थळाचे पावित्र्य राखावे. घर सुगंधी राहिल्यास चांगले होईल.मीन घरातील पाण्याच्या ठिकाणांकडे विशेष लक्ष द्या. स्वयंपाकघरात पाण्याची टाकी आणि स्टोव्ह एकत्र ठेवू नका. घराच्या कानाकोपऱ्याच्या स्वच्छतेची विशेष काळजी घ्या.

# अचानक परफ्यूम संपल्यावर हे इसेन्शियल ऑईल येतील उपयोगी, अशाप्रकारे घरीच बनवा परफ्युम

मुंबई, १३ एप्रिल : इसेन्शियल ऑइलचा वापर त्वचा आणि केसांसाठी खूप फायदेशीर आहे. म्हणूनच बहुतेक लोकांना केसांची काळजी आणि त्वचेची काळजी घेण्यासाठी त्यांचे आवडते इसेन्शियल ऑइल वापरणे आवडते. पण तुम्हाला माहित आहे का की तुम्ही इसेन्शियल ऑइलचा सुगंधदेखील घेऊ शकता? होय, परफ्यूम संपल्यावर तुम्हाला त्याजागी अत्यावश्यक तेल वापरणेदेखील सर्वोत्तम असू शकते. तसे परफ्यूम आपल्या स्टाइलमध्ये लूकमध्ये काळा टीका म्हणून काम करते. तुमचा आवडता परफ्यूम फवारल्यानंतर उत्तम पोशाख परिधान केल्यावर तुम्ही तुमच्या लुकबद्दल आत्मविश्वास वाढवता. मात्र कधी-कधी घरातील परफ्यूम संपतो आणि तुम्हाला परफ्यूम घेण्यासाठी बाजारात जायलाही वेळ मिळत नाही. तेव्हा आपण काही मिनिटांत इसेन्शियल ऑइलने घरगुती नैसर्गिक परफ्यूम तयार करू शकता.लॅव्हेंडर ऑइलपासून बनवा परफ्यूम लॅव्हेंडर ऑइलच्या मदतीने तुम्ही तुमचा संपूर्ण दिवस सुगंधित करू शकता. त्याच वेळी यामध्ये असलेले दाहक-विरोधी घटकदेखील त्वचेसाठी खूप फायदेशीर आहेत. यासाठी दररोज आंघोळीनंतर अंडरआर्म्स आणि मानेवर लॅव्हेंडर ऑइल स्प्रे करा. लॅव्हेंडर ऑइलचा नैसर्गिक सुगंध चिंता आणि तणाव दूर करण्यासाठी उपयुक्त आहे. नेरोली ऑइल परफ्यूम तसे नेरोली ऑइलचा सुगंध असलेले अनेक परफ्यूम बाजारात सहज उपलब्ध आहेत. परंतु नेरोलीच्या नैसर्गिक सुगंधासाठी, आपण नेरोली इसेन्शियल ऑइल वापरू शकता. यासाठी स्प्रे बॉटलमध्ये नेरोलीचे तेल भरून दररोज आंघोळीनंतर शरीरावर स्प्रे करा.रोज ऑइल परफ्यूम गुलाबाच्या सुगंधाची आवड असलेल्या लोकांसाठी गुलाबाच्या तेलापासून बनवलेले नैसर्गिक परफ्यूम सर्वोत्तम असू शकते. ते लावल्याने शरीराचा वास लगेच नाहीसा होतो. यासोबतच गुलाबाच्या फुलांचा सुगंधही तुमचा मूड थंड ठेवण्यास मदत करतो. यासाठी आंघोळीनंतर गुलाबाच्या तेलात कापूस बुडवून अंगावर लावा.चंदन इसेन्शियल ऑइल जर चंदनाचा सुगंध तुम्हाला आवडत असेल तर चंदनाच्या इसेन्शियल ऑइलपासून बनवलेला नैसर्गिक परफ्यूम लावणे तुमच्यासाठी एक चांगला पर्याय असू शकतो. विशेषत: ध्यान आणि आरामदायी मूडसाठी चंदनाचा परफ्यूम लावणे चांगले. मात्र चंदनाचे तेल थेट त्वचेवर फवारल्यास ॲलर्जी होऊ शकते. त्यामुळे परफ्युमप्रमाणे कपड्यांवर चंदनाचे तेल लावावे.



# हरेगाव येथील घटनेच्या जाहीर निषेधार्थ आरपीआय ( ए ) यांच्या वतीने नवी मुंबई पोलीस आयुक्त यांना जाहीर निवेदन दिले



नवी मुंबई / के. एच. हनवते :-
रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया (ए) राष्ट्रीय अध्यक्ष - दिपक (भाऊ) निकाळजे यांच्या पक्ष आदेशानुसार दिनांक : २९ आगस्ट २०२३ रोजी नवी मुंबई जिल्हा यांच्या वतीने अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील हारे गावातील बौध्द तरूणांला जातीवादी लोकानी झाडाला उलटे लटकवून अमानुषपणे मारहाण केली. त्या घटनेचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया ( ए ) पक्षाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात अला सदर या घटनेतील दोशी आरोपींना अटक करणे बाबत सिबिडी बेलापूर पोलीस आयुक्त कार्यालय येथे निवेदन दिले. सदर प्रसंगी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष - राजेंद्र (दादा) गायकवाड व नवी मुंबई जिल्हा प्रभारी प्रकाश पवार गोळवसकर यांच्या नेतृत्वाखाली सदर घटनेचा जाहीर निषेध नोंदवण्यासाठी नवी मुंबईतील (आरपीआय) पक्षाचे पदाधीकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# सरिता कांबळे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती

नवी मुंबई / के. एच. हनवते :-
सरिता कांबळे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती सरिता चंद्रकांत कांबळे या गेले अनेक वर्ष नवी मुंबई किंबहुना महाराष्ट्रभर आंबेडकरवादी चळवळीत काम करत असतात बहुजन शोषितांना, आनेक महिलांना गरजूंना अन्याय अत्याचार विरुद्ध न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करत असतात, गेल्या पंचवार्षिक महानगरपालिका निवडणूक त्यांनी लढवली होती नेमकी त्यांच्या याच कामाची दखल घेऊन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते सरिता चंद्रकांत कांबळे यांची सामाजिक न्याय विभाग राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी महिला जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. त्या



प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सामाजिक न्याय विभाग प्रा. सुनील मगरे, मुंबै जिल्हा बँक संचालक, पद्मभूषण वसंतदादा पाटील इंजिनियर कॉलेज अध्यक्ष नंदकुमार काटकर, नरेंद्र राणे, सामाजिक न्याय विभाग औरंगाबाद जिल्हाध्यक्ष दिगम्बर मोरे, मालतीताई भिसे, आशाताई खंदारे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सायकल रॅलीचे आयोजन

लातूर-लातूर येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या वतीने मंगळवारी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त भव्य सायकल रॅली काढण्यात आली.
जिल्हा क्रीडा संकुल येथून सकाळी ७.०० वाजता सायकल रॅलीला सुरुवात झाली. ही रॅली औसा रोड, शिवाजी चौक, मिनी मार्केट मार्गे जाऊन शाळेच्या मैदानावर सांगता झाली.
लाहोटी स्कुलच्या वतीने काढण्यात आलेल्या सायकल रॅलीला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातून निघालेल्या रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. रॅलीदरम्यान त्यांनी 'हम फिट तो इंडिया फिट, हम खेलेंगे तो बढेगा इंडिया, भारत माता की जय, वंदे मातरम' अशा घोषणा दिल्या.
श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे संचालक आशिष अग्रवाल आणि प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होती. प्रारंभी प्रमुख मान्यवरांनी क्रीडा संकुल येथील हुतात्मा स्मारकाला पुष्पचक्र वाहिले व भारताचे महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सायकल रॅलीला हिरवी झेंडी दाखविली.
रॅलीला संबोधित करताना प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले आणि जीवनातील खेळाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी पुढे विद्यार्थ्यांना नियमित व्यायाम करून तंदुरुस्त राहण्याचे आणि किमान एक खेळ खेळण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अणि आभार प्रदर्शन विनोद चव्हाण यांनी केले.
सायकल रॅलीच्या यशस्वितेसाठी स्कूलच्या रजिस्ट्रार प्रवीण शिवनगीकर, विनोद चव्हाण, कॅप्टन बी.के.भालेराव, शैलेंद्र डावळे, संदिप केंद्रे, हणमंत थडकर, गजानन जोशी, किशोर पांचाळ, अमित होनमाळे, बसवराज वडेवाले, तेजस धुमाळ, अमोल देशमुख, प्रशांत शिंदे, प्रकाश जकोटीया, विवेक डोंगरे, अरुण भोगे यांनी परिश्रम घेतले.

# झोपड पट्टी धारकांना मुलभूत सोई सुविधा मिळाल्याच पाहीजे..! नेरूळ बी विभाग कार्यालयांवर नवी मुंबई विकास अघाडी चा मोर्चा धडकला.

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक २८/८/२०२३ रोजी नवी मुंबई विकास अघाडीच्या वतीने नेरूळ बी विभाग कार्यालयांवर धडक मोर्चा काढण्यात अला. सदर मोर्चा हा महात्मा गांधीनगर, व रमेश मेटल कोरी, यां झोपड पट्टी धारकांना मुलभुत सोई सुविधा व पाण्यासाठी होणाऱ्या समस्या मिळणे बाबत नेरुळ बी विभाग कार्यलय येथे नवी मुंबई विकास आघाडी च्या वतीने मोर्चा काढण्यात आला होता. सदर मोर्चास प्रमुख उपस्थिती खाजामिया पटेल ( रिपब्लिकन सेना नवी मुंबई जिल्हा प्रमुख ), सलिम मुल्ला ( समाजवादी पार्टी ), महेंद्र वर्मा ( अपना दल महाराष्ट्र प्रभारी ), आशिष गोस्वामी ( अपना दल नवी मुंबई जिल्हाध्यक्ष




), बाबा न्यायनित ( राष्ट्रीय एकता दल अध्यक्ष ), हिरामण पगार ( घर हक्क संघर्ष समिती संस्थापक अध्यक्ष ), कैलाश सरकटे ( घर हक्क संघर्ष समिती खजिनदार ), उमेश खंडारे ( रिपब्लिकन सेना वाशी विभाग प्रमुख ), उल्हास नेरूरकर, अशोक जमादार, ज्ञानेश्वर जाधव, हनमंता कडमंची, अशोक भद्रे, प्रकाश वाकोडे, अँड. सुजित निकाळजे ( मुख्य सल्लागार, घर हक्क संघर्ष समिती ) व संतोष नरवडे, कुंडलीक कांबळे इत्यादी रहिवाशी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# सहा. पो.अधीक्षक निकेतन कदम यांची पोलीस ठाणे रेणापूर हद्दीत अवैध जुगारावर छापेमारी, १४ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल.



लातूर :- सहा. पो.अधीक्षक निकेतन कदम यांची पोलीस ठाणे रेणापूर हद्दीत अवैध जुगारावर छापेमारी, १४ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल . या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्याकरिता जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस उपविभाग चाकूर अंतर्गत येणाऱ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याकरिता उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी उपविभागातील पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून त्यांना सूचना व मार्गदर्शन केले असून त्यांचे मार्फत चाकूर उपविभागातील अवैध धंद्यावर कारवाई करण्याची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.
दरम्यान दिनांक २६/०८/२०२३ रोजी काही इसम पैशावर तिर्रट जुगार खेळत आहेत अशी संबंधित पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर पथकाने रेणापूर खरोळा शिवारात एका शेतातील लिंबाच्या झाडाखाली छापेमारी करून बेकायेशीररित्या जुगार खेळत व खेळवीत असताना मिळून आल्याने एकूण १४ इसमावर कार्यवाही करत त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण २ लाख ९ हजार ४२० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
पोलीस ठाणे रेणापूर मध्ये खालील नमूद इसमाविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ चा कलम १२( अ ) कायद्यान्वये प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
भागवत प्रल्हाद आडतराव,वय ३८ वर्ष, प्रकाश रामराव देशमुख, वय ५५ वर्ष, हानमंत साहेबराव राऊतराव वय ५३ वर्ष, सचीन लक्ष्मण आडतराव,वय ४९ वर्ष, अनंत गोपीनाथ घोडके, वय ४५ वष्र्, राघुनाथ रामचंद्र घोडके, वय ५७ वर्ष, रमेश धनु जाधव, वय ४० वर्ष, महेश दिलीप भोपी, वय ३५ वर्ष नागनाथ दगडु उपाडे, वय ३५ वर्ष, सलीम मेहमुद सय्य्द, वय ३३ वर्ष, गणेश बळीराम राठोड, वय २७ वर्ष, संजय पांडुरंग शिंदे, वय ५२ वर्ष, वसंत रामा लोहार, वय ६३, वर्ष उत्तम जगन्नाथ पवार, वय ५३ वर्ष सर्व रा.खरोळा ता.रेणापुर
असे असून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या आदेशावरून जिल्ह्यात अवैध व्यवसाय करणाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर धाडी मारुन कार्यवाही करण्याचे सत्र सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून दिनांक २६/०८/२०२३ रोजी पोलीस ठाणे रेणापूर येथील कारवाईत पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलिस अधिकारी चाकूर सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांचे नेतृत्वातील पीएसआय जाधव, कळ कलमे आणि इतर अंमलदार यांनी सदरची कामगिरी केली आहे. पुढील तपास रेणापूर पोलिस करीत आहेत.

# 'सॉफ्ट टिश्यु लिजन्स ऑफ द ओरल कॅव्हिटी' हे पुस्तक दंत शाखेसाठी उपयुक्त ठरेल

### डॉ. हनुमंत कराड यांचे मत; डॉ. वर्षा सांगळे लिखित पुस्तकाचे डॉ. कराड यांच्या हस्ते प्रकाशन

लातूर, दि. २९ - दंत रोग शास्त्रातील मुख रोगनिदान शास्त्र (जीरश्र झरींहेश्रेसू) व क्ष - किरण शास्त्र (ठरवळेश्रेसू) यातील महत्त्वपूर्ण पैलु 'सॉफ्ट् टिश्यु लिजन्स ऑफ द ओरल कॅव्हिटी' या पुस्तकाव्दारे डॉ. वर्षा सांगळे यांनी मांडले आहेत. त्यामुळे दंत शाखेतील विद्यार्थ्यांसाठी हे पुस्तक उपयुक्त ठरेल, असे मत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी सांचालक डॉ. हनुमंत कराड यांनी व्यक्त केले.
लातूर येथील माईर एमआयटी पुणे संचलित एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील ओरल पॅथोलॉजी विभागातील सहयोगी प्राध्यापीका डॉ. वर्षा अजित सांगळे लिखित 'सॉफ्ट् टिश्यु लिजन्स ऑफ द ओरल कॅव्हिटी' या पुस्तकाचे मंगळवार, दि. २९ ऑगस्ट रोजी कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी लेखिका डॉ. वर्षा सांगळे, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे,




डॉ. यतीशकुमार जोशी हे उपस्थित होते. दंत शाखेतील बी. डी. एस. पदवी अभ्यासक्रम, पदवी अतर्गच्या सैध्दांतीक परीक्षा, दंत शाखेशी सबंधीत स्पर्धा परिक्षेचे विद्यार्थी यांच्याकरीता हे पुस्तक फायदेशीर असून ते मेझॉन वर खरेदीसाठी उपलब्ध असणार आहे, अशी महिती लेखिका डॉ. वर्षा सांगळे यांनी दिली.

# डोंगरे दाम्पत्याचा देहदानाचा संकल्प

लातूर:- वाले नगर खाडगाव रोड लातूर येथील रहिवासी असलेले शिवाजी डोंगरे व त्यांच्या पत्नी सौ. मनोरमा शिवाजी डोंगरे या पती पत्नीने लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मरणोत्तर देह दानाचा संकल्प केला. वैद्यकीय शिक्षणासाठी ऊपयोग व्हावा म्हणून मरणोत्तर देहदान करण्याचा संकल्प डोंगरे दाम्पत्यांनी केला,याबाबतीत नियमानुसार सर्व बाबींची पुर्तता करून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या शरीर रचना शास्त्र विभागात उद्धव बाळासाहेब ठाकरे लातूर शिवसेनेचे जेष्ठ शिवसैनिक सामाजिक कार्यकर्ते त्र्यंबक स्वामी यांनी, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय शरीर रचना शास्त्र विभाग देहदान समिती सदस्य प्रा. डॉ संतोष डोपे यांचेकडे रितसर नोंदणी अर्ज भरून दिला .




आज विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ समीर जोशी व महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना ओळखपत्र देण्यात आले , यावेळी बोलताना अधिष्ठाता समीर जोशी यांनी डोंगरे दाम्पत्यांना दीर्घायुष्य लाभो अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी महासंघाचे उपसभापती तथा शिवसेना सहसंपर्कप्रमुख संतोष भाऊ सोमवंशी, अधिष्ठाता डॉ समीर जोशी, डॉ. संतोष डोपे, महानगर प्रमुख विष्णूपंत साठे, वैद्यकीय महाविद्यालय अभ्यागत मंडळाचे सदस्य त्र्यंबक स्वामी, शिवसेना लातूर शहर प्रमुख रमेश माळी, कामगार सेना लातूर जिल्हाध्यक्ष तानाजी करपुरे, महाराष्ट्र अटोरिक्षा चालक सेनेचे लातूर जिल्हा अध्यक्ष बंडूसिंग भाट, सचिन पाटील युवा सेना उपजिल्हाप्रमुख किशोर मोहिते, कृष्णा जाधव, सिद्धेश्वर जाधव,सचिन डोंगरे आदी उपस्थित होते

# जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रामार्फत नेत्र तपासणी, भ्रमणध्वनी, टीएलएम कीटचे वितरण

लातूर, दि. २९ (जिमाका): हरंगुळ बु. येथील संवेदना प्रकल्प येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत बुद्धीबाधित दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष शैक्षणिक टीएलएम (टीचिंग लर्निंग मटेरीअल) किटचे वितरण करण्यात आले. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची नेत्र तपासणी आणि दिव्यांगाना सहाय्यभुत साधनांचे वितरण करण्यात आले. सिकंदराबाद येथील राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, संवेदना प्रकल्प, समाज कल्याण विभाग आणि विवेकानंद मेडिकल फौंडेशन व रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.केंद्र सरकारच्या दिव्यांगजन सशक्तीकरण विभागाच्या केंद्रीय सल्लागार समितीचे सदस्य व प्रकल्प संपर्क प्रमुख सुरेश पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, उदय जोगळेकर, संवेदना प्रकल्प कार्यवाह डॉ. योगेश निटुरकर, संवेदना शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती दिपा पाटील, राजू गायकवाड, संवेदना प्रकल्प समितीचे कोषाध्यक्ष पांडुरंग चाफेकर यावेळी उपस्थित होते.
जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या कार्यचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी कौतुक केले. तसेच समाज कल्याण विभागामार्फत दिव्यांगांसाठी विविध योजना राबविण्यासाठी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. संवेदना प्रकल्प येथे दिव्यांग औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु होणार आहे, यामाध्यमातून दिव्यांगांसाठी इलेक्ट्रॉनिक्स, ड्रेस मेकेइंग व कॉम्प्यूटर ऑपरेटर या विषयासंबंधी लागणारी यंत्र सामग्री व सर्व सोयी सुविधा उपलब्ध झाल्याने दिव्यांगाना रोजगार मिळेल. ते स्वाभिमानाने जगू शकतील. शासनाच्या माध्यमातून याठिकाणी कॅम्पस मुलाखती घेण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.
संवेदना प्रकल्पाचे अध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकेमध्ये संवेदना प्रकल्पाच्या विविध उपक्रमाची माहिती देवून युडीआयडी कार्ड, भ्रमणध्वनी वितरण आणि तपासणी शिबिराचा उद्देश सांगितले.
नदीहत्तरगा येथील जनकल्याण दिव्यांग पुनर्वसन केंद्रातील दिव्यांग मुलांनी तयार केलेले राखी, पुष्पहार व पेपर कप इत्यादी साहित्याची पाहणी उपस्थितांनी केली. राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्थेच्या मुंबई क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक प्राध्यापक डॉ. वसिम अहमद यांनी विशेष शैक्षणिक साहित्याबद्दल माहिती दिली

# चिपळूण शहराच्या विकासासाठी शासनाच्या ठोक तरतुदी अंतर्गत ६ कोटींचा निधी मंजूर आमदार शेखर निकम यांची पत्रकार परिषदेत माहिती

चिपळूण (प्रतिनिधी):-- शासनाच्या ठोक तरतूदीअंतर्गत चिपळूण शहरासाठी एकूण ६ कोटींची विकासकामे मंजूर झाली असून त्यामध्ये अल्पसंख्यांक समाजातील कब्रस्तान, गांधारेश्वर, रामतीर्थ सुशोभिकरणासह विविध कामांचा समावेश आहे. शहरातील विविध विकासकामांसाठी आतापर्यत एकून ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात यश आले असल्याची माहिती आमदार शेखर निकम यांनी सोमवारी येथे पत्रकारांशी बोलताना दिली.
ते पुढे म्हणाले की, शहरातील विविध विकासकामांना चालना देण्याच्या दृष्टीने आपण



प्रयत्न करत आलो आहोत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री उदय सामंत यांच्या माध्यमातून शहरातील प्रलंबित प्रश्नांमध्ये इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्राचा विषय मार्गी लागला आहे. यापुढील काळात मिनी थिएटर, पेठमाप - मुरादपूर पुलाच्या दोन्ही बाजूच्या ॲप्रोच रोडसह अन्य विकास प्रकल्पांचाही समावेश आहे. नुकतेच शहर विकासासाठी सहा कोटींचा निधी मंजूर झाला असून त्यामध्ये अल्पसंख्यांक समाजातील कब्रस्थान सुशोभिकरण, रस्ते, पाखाडी गटारे, संरक्षण भिंत यासाठी २ कोटी ७५ लाखांच्या कामांना मंजूरी मिळाली आहे. त्याबरोबर रामतीर्थ स्मशानभूमी सुशोभिकरण, गांधारेश्वर परिसर सुशोभिकरण व सर्व प्रभागातील विविध विकासकामांचा यामध्ये समावेश आहे.
गतवर्षी ठोक तरतुदीतून शहरासाठी ३ कोटी ६० लाखांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामध्ये सर्व प्रभागांमध्ये ओपन जीमसाठी ९० लाख, स्विमिंग पुलासाठी ७५ लाख, अण्णासाहेब खेडेकर क्रिडा संकूलात बॅडमिंटन कोर्टसाठी ५० लाख, फुलपाखरू उद्यान विकसित करण्यासाठीही निधी मंजूर आहे. शहरातील पार्कींगची वाढती समस्या दुर करण्याकरीता ६५ लाख मंजूर झाले असून सदर कामे ही प्रशासकीय मान्यातेसाठी सादर करण्यात आली आहेत.
त्याबरोबर अल्पसंख्यांक विभागामार्पत ४० लाखांची कामे मंजूर करून ती सध्या सुरूही आहेत.
दरम्यान आमदार झाल्यानंतर २०१९ मध्ये पवन तलाव मैदान विकासीत करण्याकरीता १ कोटी ५० लाख, गोवळकोट मैदानासाठी १ कोटी २५ लाख, पेठमाप मुरादपूर पूलासाठी १२ कोटी, नारायण तलाव सुशोभिकरणासाठी साडेतीन कोटी अशी एकूण आमदार झाल्यानंतर ३० कोटींची कामे शहर विकासासाठी मंजूर करण्यात यश आले असल्योही आमदार निकम यांनी सांगीतले.
यावेळी राष्ट्रवादो प्रदेश चिटणीस जयंद्रथ खताते, शहराध्यक्ष मिलिंद कापडी, उदय ओतारी, माजी नगराध्यक्षा रिहाना बिजले, वर्षा जागृष्टे, शिवानी पवार, आदीती देशपांडे आदी उपस्थित होत्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE